**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, MAR–APR, 2018, VOL- 5/44*

# भारतीय पंचवार्षिक योजना आणि उच्च शिक्षणातील समावेशकता

**प्रकाश बच्छाव & प्रो. संजीव सोनवणे**

*पी. एच. डी. संशोधक, शिक्षणशास्त्र आणि विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे*

*प्रो, विभाग प्रमुख, शिक्षणशास्त्र आणि विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे*

**Abstract**

*कोणत्याही देशाचा विकास शिक्षणावर अवलंबून असतो. शिक्षणातून एखादा घटक वंचित राहिला तर त्याचा परिणाम एकंदर समाजव्यवस्थेवर होतो. समाजाचा विकास साधण्याचा राजमार्ग दर्जेदार शिक्षण व्यवस्थेतून निर्माण होणारे गुणवत्तापुर्ण मनुष्यबळ निर्मिती हा असतो. उच्च शिक्षणाची सर्वोच्च संधी ग्रामीण, गरीब, शेतकरी, मजूर, महिला, दलित, आदिवासी, अपंग व अन्य वंचित घटकापर्यंत पोहचविण्याची या वर्गांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची भूमिका शासन व विद्यापीठांना सक्षमपणे घ्यावी लागेल. उच्च शिक्षण हे सामाजिक न्यायाचे व समान संधीचे साधन आहे. हे लक्षात घेउन सर्वसमावेशक धोरणांची (Inclusive Policy) आवश्यकता विषद केली आहे. भारतीय राज्य घटनेतील मार्गदर्शक तत्वानुसार सामाजिक न्यायाच्या उपाययोजना अंमलात आणण्यासाठी नियोजनकारांनी पंचवार्षिक योजनांची आखणी केली. सन १९५१ पासून २०१२ पर्यंत एकूण ११ पंचवार्षिक योजना राबविण्यात आल्या. प्रारंभीच्या दोन योजनांमध्ये पायाभूत सुविधा, समुदाय विकास कार्यक्रम व माणूस हाच विकासाचा केद्रंबिंदू मानून पंचवार्षिक योजनांची उदिद्ष्टये निश्‍चित करण्यात आली. कालानुक्रमे रोजगार, शिक्षण या बरोबरच स्वयंपूर्णतेकडे जलद वाटचाल करण्यासाठीचे प्रयत्न झाले. ८ व्या पंचवार्षिक योजना कालावधीत प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण घडवून आणणे व वय वर्ष १५ ते ३५ वयोगटातील निरक्षरता दूर करणे म्हणजेच प्रौढ शिक्षणाचा प्रचार व प्रसार या योजना कालावधीत करण्यात आला. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीरणाच्या प्रयत्नानंतर १० व्या व ११ व्या पंचवार्षिक योजना कालावधीमध्ये उच्च शिक्षणाकडे तसेच या शिक्षणामधील सर्वसमावेशकतेकडे लक्ष केद्रींत करण्यात आले.*

**महत्वाचे मुद्दे:** *पंचवार्षिक योजना, उच्च शिक्षणातील समावेशकता*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

कोणत्याही देशाचा विकास बहुतांशी शिक्षणावर अवलंबून असतो. शिक्षणातून एखादा घटक वंचित राहिला तर त्याचा परिणाम एकंदर समाजव्यवस्थेवर होतो.

शिक्षण हे मानवी विकासाचे महत्वाचे साधन आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीच्या केवळ लेखन व वाचन क्षमता विकसित करणे एवढेच अपेक्षित नसून व्यक्तींमधील सुप्तगुणांचा शोध घेउन त्यांचा विकास करुन, परिपूर्ण व्यक्तिमत्व घडविणे हे शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे. मानव जातीचा विकास करण्यास सक्षम असणारी भावी पिढी घडविण्याचे महत्वाचे आवाहान २१ व्या शतकातील ज्ञानयुगात असणार आहे. शिक्षणावरील खर्च हा खर्च न समजता गुंतवणूक समजून अशी गुंतवणूक कोणकोणत्या क्षेत्रामध्ये करणे आवश्यक आहे. जेणेकरुन भविष्यामध्ये राज्याच्या पर्यायाने देशाच्या विकासामध्ये हातभार लागेल.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

समाजाचा विकास साधण्याचा राजमार्ग दर्जेदार शिक्षण व्यवस्थेतून निर्माण होणारे गुणवत्तापुर्ण मनुष्यबळ निर्मिती हाच असतो. म्हणूनच राष्ट्रीय तसेच वैयक्तिक विकासामध्ये शिक्षण हे एक मौलिक व सर्वमान्य साधन मानले जाते.

शिक्षण एक सामाजिक – आर्थिक प्रगतीकडे नेणारी सक्षमीकरणाची प्रक्रिया आहे. जगाने हे आता मान्य केलेले आहे की, आर्थिक भांडवलाइतके मानवी भांडवलाचेही (Human Capital) महत्व आहे.

एखाद्या राज्यात उत्तम दर्जाची संसाधने, नैसर्गिक साधन संपत्ती व सुबत्ता असेल पण या साधन संपत्तीचे प्रगतीसाठी उपयोजन कसे करायचे याचे भान व ज्ञान असणारे कुशल व तज्ज्ञ मनुष्यबळ नसेल तर संसाधनांचा पुरेसा लाभही प्राप्त होत नाही. तेव्हा संसाधनांची जपणूक, वाढ व उपयोजन करण्याचे ज्ञान व शहाणपण असणारे मनुष्यबळ हे कोणत्याही राज्याच्या प्रगतीचा आत्मा मानला जातो.

भारताला ज्ञानाधारीत समाजामध्ये रुपांतरीत करुन त्याचे सामाजिक, आर्थिक लाभ राष्ट्रीय–आतंरराष्ट्रीय स्तरावर प्राप्त करण्यासाठी प्राप्त ज्ञान व्यवस्था म्हणजेच शिक्षण व्यवस्थेमध्ये आमुलाग्र सुधारणांची निकड या राष्ट्रीय ज्ञान आयोगाने मांडली. वाढता सहभाग आणि अधिक न्याय अशी सर्वांना समान्य शिक्षण उपलब्धतता निर्माण करण्याची गरज हा आयोग अधोरेखीत करतो.

उच्च शिक्षणाची सर्वोच्च संधी ग्रामीण, गरीब, शेतकरी, मजूर, महिला, दलित, आदिवासी, अपंग व अन्य वंचित घटकापर्यंत पोहचविण्याची या वर्गांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची भूमिका शासन व विद्यापीठांना सक्षमपणे घ्यावी लागेल. उच्च शिक्षण हे सामाजिक न्यायाचे व समान संधीचे साधन आहे. हे लक्षात घेउन सर्वसमावेशक धोरणांची (Inclusive Policy) आवश्यकता विषद केली आहे.

भारतामध्ये समावेशी शिक्षणाचा इतिहास अत्यंत प्राचीन आहे. तसेच शिक्षणामधील ही समावेशकता वाढविण्यासाठी विविध कायदे आणि शासकीय धोरणांच्या माध्यमातूनही प्रयत्न सुरू आहेत. शालेय शिक्षणामध्ये त्याचा प्रभावी परिणाम दिसून आला आहे. असे असले तरी उच्च शिक्षणामध्ये मात्र सर्वसमावेशकतेची परिस्थिती तितकीशी समाधानकारक दिसून येत नाही.

समावेशित शिक्षण पद्धती ही उत्तम शिक्षण पद्धती म्हणून ओळखली जाते. कारण या पद्धतीमध्ये,

१) शिक्षण समाजाच्या सर्व घटकांना उपलब्ध होते.

२) शिक्षण सर्वदूर उपलब्ध होते.

३) विद्यार्थ्यांच्या सर्व गरजांची पूर्तता करण्याचा प्रयत्न केला जातो.

४) विविध शिक्षण पद्धतींचा अवलंब केला जातो.

५) विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार व कुवतीनुसार शिक्षणात प्रगती करण्याची संधी मिळते.

६) दर्जेदार व जीवन उपयोगी शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो.

थॉमस, १९९१ नुसार, ''समावेशन म्हणजे शिक्षण पद्धतीच्या मुख्य धारेत सर्वांचा स्वीकार, त्या सर्वांना सामान्य शिक्षणाच्या चौकटीत शिकविणे.'' हे निवेदन १९९४ साली सालामानका येथे स्पेनमध्ये झालेल्या बैठकीत पारीत करण्यात आले. याचाच अर्थ समावेशक शिक्षण पद्धती ही लवचिक शिक्षण पद्धती आहे. या पद्धतीत अध्यापनासाठी लागणारे साहित्य हे गरजेनुसार वेगवेगळे लागते. या शिक्षण पद्धतीमध्ये अभ्यासक्रम हा सुद्धा सर्वसमावेशक असणे गरजेचे आहे. या पद्धतीमध्ये शिकणारा विद्यार्थी घरी पालकाबरोबर राहतो व जवळच्या शाळेत सर्व मुलांबरोबर शिकतो.(म.रा.शै.सं.प.पुणे, २००६)

**सर्वसमावेशक शिक्षणाची वैशिष्ट्ये**

१) शिक्षणामध्ये सर्व प्रकारच्या मुलांना प्रवेश देणे.

२) शिक्षकांच्या अंगी सर्व प्रकारच्या मुलांना शिकविण्याचे अध्यापन कौशल्य असावे लागते.

३) विशेष शैक्षणिक गरजा असणाऱ्या मुलांचे सुद्धा शिक्षक व संस्था स्वागत करतात.

४) सर्व प्रकारच्या मुलांना शिकविण्याच्या सुविधा शिक्षणात असतात.

५) गरजू मुले शिक्षणापासून वंचित राहत नाहीत.

६) मुलांच्या प्रगतीसाठी पालकाची भूमिका मित्रत्वाची असते.

७) मुलांच्या क्षमतेनुसार शिक्षणाची वेगवेगळी उद्दिष्टे ठेवली जातात.

८) मुलांच्या प्रगतीकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते.

**सर्वसमावेशक शिक्षणाचे फायदे**

१) प्रत्येकाला आपल्या आवडीच्या, सोयीच्या संस्थेत शिक्षण घेण्याची सोय प्राप्त होईल.

२) सर्वांच्या एकत्र शिक्षणाने शिक्षणावरील खर्च कमी होईल.

३) समाजातील मागास, दुर्बल घटकालाही शिक्षणाची संधी सहज उपलब्ध होईल.

४) शिक्षणाबद्दल समाजाचा सकारात्मक दृष्टिकोन तयार होण्यास मदत होईल.

**भारतीय पंचवार्षिक योजना**

राज्य घटनेतील मार्गदर्शक तत्वानुसार सामाजिक न्यायाच्या उपाययोजना अंमलात आणण्यासाठी नियोजनकारांनी पहिल्या पंचवार्षिक योजनेची आखणी केली. पहिल्या पंचवार्षिक योजनेपुर्वीची आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन योजना यशस्वीपणे राबविली जावी याकरीता एक निश्चित नीती तयार केली गेली. या नीती नुसार दुसरे महायुध्द व

फाळणीमुळे निर्माण झाालेले प्रश्न सोडविणे व राष्ट्राची पुनर्बांधणी करणे हे मुख्य हेतू डोळयासमोर ठेवून उर्जा साधने विकसित करणे, वाहतुक व दळणवळण यंत्रणेची व्याप्ती व विस्तार वाढविणे, आरोग्य व शिक्षण सुविधा सहज व अत्यल्प खर्चात उपलब्ध करुन देणे, यावर योजनांच्या माध्यमातून भर देण्यात आला.

कृषी, दळणवळण, औद्योगिकीकरण, आर्थिक विकास या प्रमुख घटकांवर लक्ष केंद्रीत करुन अनुषंगिक योजना राबविण्याबरोबर सामाजिक न्याय, साक्षरता, देशातील गरीबी दूर व्हावी व देशाचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्‌देशाने सन १९५१ मध्ये स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय पंचवार्षिक योजना अर्थात फाइव्ह इयर प्लॅन्स ऑफ इंडिया ची सुरूवात केली.

पंचवार्षिक योजना भारतीय नियोजन आयोगामार्फत राबविल्या जातात. परंतु नियोजन आयोग बरखास्त करून नवीन नीति आयोगाची स्थापना झाल्यामुळे दिनांक १ जानेवारी २०१५ पासून या योजना राबविण्याची जबाबदारी नीति आयोग पार पाडत आहे. राष्ट्रीय विकास परिषद(एनएसडी) पंचवार्षिक योजनांना अंतीम रूप देते. भारताचे पंतप्रधान हे भारतीय नियोजन मंडळाचे अर्थात आता नीति आयोगाचे तसेच राष्ट्रीय विकास परिषदेचे पदसिद्‌ध अध्यक्ष असतात. अर्थातच भारतीय पंचवार्षिक योजनांचे अध्यक्ष पदही पंतप्रधानांकडे असते.

आजतागायत वर्ष २०१६ पर्यंत एकूण ११ पंचवार्षिक योजना राबविल्या गेल्या असून १२ वी पंचवार्षिक योजना सुरु आहे. जी नीति आयोगामार्फत राबविली जात आहे.

**१ली पंचवार्षिक योजना**

ही योजना इस १९५१ ते १९५६ दरम्यान राबविण्यात आली. या योजनेमध्ये कृषी विकासाला अग्रक्रम देण्यात आला होता. या योजनेमध्ये शेती, उर्जा व जलसिंचनाला प्राधान्य देण्यात आले. या योजना कालात देशात १९५२ पासून समुदाय विकास कार्यक्रम किंवा Community Development Programme राबविण्यास सुरुवात झाली. या योजना काळात स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात २.१ टक्क्यांची वाढ घडवून आणण्याचे उदिदष्ट होते. परंतू, ही योजना मोठया प्रमाणात यशस्वी होउन राष्ट्रीय उत्पन्नात या योजना काळात १८ टक्के इतकी वाढ घडून आली.

**२री पंचवार्षिक योजना**

दुसरी पंचवार्षिक योजना इस १९५६ ते १९६१ दरम्यान राबविण्यात आली. यात जड व मुलभूत उद्‌योगांना अग्रक्रम देण्यात आला होता. औद्योगिकीकरणातून जलद आर्थिक विकास साध्य करण्याचे तत्व या योजनेत स्वीकारण्यात आले. राष्ट्रीय उत्पन्नात प्रतिवर्षी ५ टक्के म्हणजे एकूण योजना काळात २५ टक्के वाढ घडवून आणणे, १० ते १२ दशलक्ष व्यक्तींसाठी नव्याने

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

रोजगार निर्माण करणे, अवजड व पायाभूत उद्योगांच्या विकासावर विशेष भर देऊन देशास वेगाने औद्योगिकीकरणाच्या दिशेने नेणे, उत्पन्नातील व संपत्तीतील विषमता दूर करुन आर्थिक साधन संपत्तीचे अधिक समान वाटप घडवून आणणे, ही या योजनेची उद्दीष्टये होती.

या योजनेत समाजवादी समाजरचनेचे ध्येय निश्चित करण्यात येऊन सामान्य माणूस हाच विकासाचा केंद्रबिंदू ठरविण्यात आला. औद्योगिक विकासाकडे लक्ष देउन उपभोग्य वस्तूंच्या निर्मितीऐवजी उद्योगधंद्यांच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या यंत्रसामग्रीच्या निर्मितीवर भर दिला गेला. या योजने अखेर राष्ट्रीय उत्पन्नात १९.५ टक्के इतकी वाढ घडून आली.

**३री पंचवार्षिक योजना**

पहिल्या दोन योजनांच्या यशस्वीतेनंतर तिसऱ्या महत्वाकांक्षी योजनेची रचना केली गेली. तिसरी योजना इ.स. १९६१ ते १९६६ या कालावधीत राबविण्यात आली. या योजनेमध्ये कृषि विकास, मुलभूत उद्योग, संरक्षण आणि विकासाला अग्रक्रम देण्यात आला होता. शेती व उद्योग यांना एकत्रितरित्या प्राधान्य देणारी तसेच अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यावर भर देणे, देशातील श्रमशक्तीचा जास्तीत जास्त वापर करुन साधन संपत्तीत वाढ घडवून आणणे, अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, विकासाचा असमतोल दूर करणे, आर्थिक शक्तीचे समान वाटप घडवून आणणे ही या योजनेची उद्दिष्टये असून या योजना कालावधीत चीनने २० ऑक्टोबर, १९६२ ला भारतावर आक्रमण केले. त्यामुळे साधन सामुग्रीवर प्रतिकुल परिणाम घडून आला. पर्यायाने आर्थिक विकासापेक्षा राष्ट्रीय संरक्षणास महत्व देणे क्रमप्राप्त ठरले. त्यामुळे या योजना काळात राष्ट्रीय उत्पन्नाचे उदिदष्ट साध्य करता आले नाही.

**४थी पंचवार्षिक योजना**

इ.स. १९६९ ते १९७४ दरम्यान राबविण्यात आलेल्या या योजनेमध्ये आर्थिक विकासाला अग्रक्रम देण्यात आला.

रोजगार व शिक्षण या माध्यमातून असंरक्षित व दुर्बल घटकांच्या विकासावर अधिक भर देण्यात आला. देशातील श्रमशक्तीचा योग्य वापर करुन ग्रामीण व शहरी भागातील श्रमिकांसाठी अधिक रोजगार निर्माण करण्यासाठी या योजना काळात अधिक लक्ष दिले गेले. स्वयंपुर्णतेकडे जलद वाटचाल, आर्थिक विकास, विकासाचा प्रोदशिक समतोल व सामाजिक न्याय ही चौथ्या योजनेची ठळक वैशिष्टये होय. त्यामुळे समतोल आर्थिक विकास प्रतिमानावर आधारलेली योजना म्हणून देखील या योजनेची ओळख आहे.

**५वी पंचवार्षिक योजना**

ही योजना इस १९७४ ते १९७९ दरम्यान राबविण्यात आली. या योजनेमध्ये दारिद्रय निर्मूलनास अग्रक्रम देण्यात आला. उत्पादक रोजगारात वाढ घडवून आणणे, आदिवासी जाती

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

जमाती व समाजातील अन्य दुर्बल घटकांच्या किमान गरजा पूर्ण करणे, समाज कल्याण कार्यक्रमांची व्याप्ती वाढविणे, समाजातील दुर्बल घटकांना प्राथमिक गरजेच्या वस्तूंचा पर्याप्त पुरवठा करणे, सामाजिक, आर्थिक व प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी संस्थात्मक, राज्यवित्तीय आणि अन्य उपाययोजना करणे, यासारखी उदिदष्टे या योजना काळात निश्चित करण्यात आली.

या योजना काळात किमान गरजा कार्यक्रम राबविण्यास सुरुवात करण्यात आली.

**६वी पंचवार्षिक योजना**

ही योजना इस १९८० ते १९८५ दरम्यान राबविण्यात आली. या योजना कालावधीत शेती व ग्रामीण विकास या क्षेत्रात जास्तीत जास्त गुंतवणूक करण्यात आली व दारिद्रय निर्मुलन व रोजगार निर्मितीवर भर देण्यात आला.

आर्थिक व सामाजिकदृष्टया दुर्बल घटकांचे जीवनमान सुधारणे, विकासातील प्रादेशिक असमतोल सुधारणे, अत्याधुनिकतेवर भर देऊन विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रात स्वावलंबी होणे, दारिद्रय निर्मुलनास विशेष महत्व देऊन भावी काळाचा वेध (आगाची १५ वर्ष कालखंडाचा) घेण्यात आला.

ग्रामीण भूमीहीन रोजगार हमी कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना या सारख्या रोजगार निर्मिती व दारिद्रय निर्मुलनास पुरक अशा योजना, या योजना कालावधीत राबविण्यात आल्या.

**७वी पंचवार्षिक योजना**

ही योजना इस १९८५ ते १९९० दरम्यान राबविण्यात आली. नियोजनाचे विकेंद्रीकरण व सर्वसामान्य जनतेचा विकासात सहभाग, जास्तीत जास्त रोजगार निर्मिती, दारिद्रय निर्मुलन, अन्नधान्याच्याबाबतीत स्वयंपूर्णता, शिक्षण व आरोग्य, स्वच्छता इ. क्षेत्रात सार्वत्रिक प्रगती, स्त्रियांना आर्थिक व सामाजिक क्षेत्रात योग्य वाव, अपरंपरागत उर्जास्त्रोताच्या उपयोगावर भर, शास्त्र व तंत्रज्ञानाचा विकासात सहभाग, ही या योजनेची महत्वाची उदिदष्टये होती.

जास्तीत जास्त रोजगारनिर्मिती व दारिद्रय निर्मुलन ही दुहेरी उदिदष्ट असलेली जवाहर रोजगार योजना ही योजना या योजना कालावधीत सुरु झाली. यात उत्पादक रोजगार निर्मितीला अग्रक्रम देण्यात आला होता.

**८वी पंचवार्षिक योजना**

ही योजना इस १९९२ ते १९९७ दरम्यान राबविण्यात आली. बेरोजगारीचा प्रश्न पूर्णपणे सुटेल असा उददेश ठेवून पुरेशा प्रमाणात रोजगारनिर्मिती करणे, जनतेच्या सहकार्याने लोकसंख्यावाढीचा वेग कमी करणे, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण घडवून आणणे व वय वर्ष

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

१५ ते ३५ या वयोगटातील निरक्षरता दूर करणे, सर्व जनतेस पिण्याचे स्वच्छ पाणी व आरोग्यविषयक प्राथमिक सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे, कृषि उत्पादनात क्रांतिकारक वाढ घडवून स्वयंपूर्णता साध्य करणे, निर्यातीकरिता अतिरिक्त धान्योत्पादन करणे, उर्जा, परिवहन, दळणवळण, जलसिंचन यांसारख्या पायाभूत क्षेत्रांत प्रगती घडवून आणणे, ही या योजनेची उदिदष्टे होती.

या योजनेमध्ये मनुष्यबळाच्या विकासाला अग्रक्रम देण्यात आला होता.

**९वी पंचवार्षिक योजना**

ही योजना इस १९९७ ते २००२ दरम्यान राबविण्यात आली. दारिद्रयनिर्मूलन आणि रोजगारनिर्मिती यांसाठी कृषी आणि ग्रामीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य देणारा नवव्या पंचवार्षिक योजनेचा अंतिम आराखडा १ मार्च, १९९८ रोजी जाहीर करण्यात आला.

विकासाचा ७ टक्के दर राखण्यासाठी या योजनेत अन्नधान्याच्या स्वयंपूर्णतेसाठी कृषिक्षेत्राचा विकास, रोजगारवाढ आणि पायाभूत क्षेत्रांचा विकास यांवर भर देण्यात आला. बेरोजगारी व दारिद्रयनिर्मूलन यासाठी कृषीक्षेत्राच्या विकासाबरोबरच औद्योगिक विकास साधणेसाठी परदेशी भांडवल गुंतवणुकीस या योजनेच्या आराखडयात महत्व दिले गेले. यात उत्पादक रोजगार निर्मितीला अग्रक्रम देण्यात आला होता.

या एकूण ९ पंचवार्षिक योजनांपैकी कोणत्याही योजनेमध्ये शिक्षणास अग्रक्रम देण्यात नाही. मात्र, १० व्या पंचवार्षिक योजनेमध्ये प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे उद्‌दिष्ट डोळयासमोर ठेवून दहावी पंचवार्षिक योजनेत प्रथमच शिक्षणासाठी मोठे स्थान देण्यात आले होते.

**१०वी पंचवार्षिक योजना**

ही योजना इस २००२ ते २००७ या कालावधी दरम्यान राबविण्यात आली. या योजनेमध्ये आर्थिक विकास ८ टक्के महत्वाकांक्षी दराने साध्य करणे. प्राथमिक शिक्षणाचे २००७ पर्यंत सार्वत्रिकीकरण करणे, साक्षरतेचे प्रमाण ७५ टक्के पर्यंत नेणे, नवजात अर्भकाच्या मृत्यूचे प्रमाण २००७ पर्यंत प्रतिहजार ४५ तर २०१२ पर्यंत २८ पर्यंत कमी करणे, याबरोबरच माता मृत्यूचे प्रमाण, जंगलाखालील जमीनीचे क्षेत्र, नद्यांचे शुद्‌धीकरण जन्मदर, विकासदर साध्य करणे अशा उद्‌दिष्टांना अग्रक्रम देण्यात आला होता. सर्व शिक्षा अभियानाचे यश ही १०व्या पंचवार्षिक योजनेतील शिक्षणाच्या दृष्टीकोनातील महत्त्वाची घटना आहे.

१०व्या पंचवार्षिक योजनेमध्ये गुंतवणुकीच्या क्षेत्रांचे एकूण पाच क्षेत्रात विभाजन केले आहे: १) शिक्षण आणि आरोग्य २) कृषि आणि उद्योग ३) पायाभूत सुविधा ४) अन्य सामाजिक आणि आर्थिक सेवा ५) सामान्य सेवा

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

यापैकी शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांतर्गत योजनेमध्ये, शिक्षण, खेळ, कला आणि सांस्कृतिक, चिकित्सा, परिवार नियोजन, सार्वजनिक आरोग्य आणि पाणिपुरवठा व स्वच्छता यांचा समावेश केला आहे.

दहाव्या योजनेत शिक्षण क्षेत्रात विशेष भर प्राथमिक शिक्षणावर देण्यात आला होता. त्यासाठी ५० हजार कोटी रूपये खर्च करण्यात आला. मात्र, उच्च शिक्षण आणि विविध विद्यापीठांसाठी या योजनेच्या काळात केवळ ८ हजार कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली.

या योजनाकाळात उच्च शिक्षणाचा लक्षणीय विस्तार झाल्याचे दिसून येते. तथापि, या योजनेचा मुख्य भर प्राथमिक शिक्षणावर होता.

**११वी पंचवार्षिक योजना**

इ.स. २००७ ते २०१२ हा ११व्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी आहे. वेगवान आणि सर्वसमावेशक विकासाकडे असे या योजनेच्या मसुदापत्राचे शीर्षक आहे. यामध्ये अर्थव्यवस्थेच्या क्षमता आणि सुप्त गुणांवर विशेष भर देण्यात आला आहे. या कालावधीतच शिक्षणाचा अधिकार कायदा, २००९ हा शिक्षण क्षेत्रासाठी मैलाचा दगड असणारा महत्त्वाचा कायदा पास झाला. याचबरोबर १०व्या पंचवार्षिक योजनाकाळात सुरू करण्यात आलेल्या सर्वशिक्षा अभियानाला चांगले यश मिळाल्यामुळे आता या योजनेच्या दरम्यान माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणावर भर देण्यात येणार आहे. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील गळती रोखण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. दर्जेदार शिक्षणावरही लक्ष पुरविण्याचे निश्चित झााले.

११व्या पंचवार्षिक योजनेत उच्च शिक्षणाचा स्वतंत्र मुद्द्यांतर्गत विस्तृत विचार करण्यात आला आहे. या योजनेमध्ये उच्च शिक्षणाची ध्येये आणि कार्यनीती प्रस्तूत करण्यात आली आहे. यामध्ये १) उच्च शिक्षणातील प्रवेश व अभ्यासक्रम २) उच्च शिक्षणाचे मूल्यमापन ३) शिक्षण संस्थांचे मूल्यांकन आणि पदनिश्चयन ४) शिक्षक क्षमता आणि प्रेरणा अशा एकूण चार विभागामध्ये उच्च शिक्षणाची ध्येये आणि कार्यनीतीचे स्वरूप निर्धारित केले आहे. यामध्ये उच्च शिक्षणाच्या संस्थांचे उत्तरदायित्वही निश्चित करण्यात आले आहे.

शिक्षणाच्या विस्ताराच्या अनुषंगाने या योजनांमध्ये प्रवेशाच्या दृष्टीकोनातून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि अल्पसंख्यांक प्रवर्गाच्या शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे.

समावेशक शिक्षण हा या योजनेमध्ये स्वतंत्र मुद्दा म्हणून घेण्यात आला आहे.ज्या संस्थांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि महिला विद्यार्थी व अल्पसंख्यांक तसेच शारीरिक अक्षम विद्यार्थी अधिक असतील त्या संस्थांकडे विशेष लक्ष देण्याचे

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

धोरण या योजनेमध्ये दिसून येते. तसेच या योजनेमध्ये गुणवत्ता वाढीसाठीही मोठया प्रमाणावर विचार करण्यात आला आहे.

यावरून लक्षात येते की, भारतामध्ये आत्तापर्यंतच्या पंचवार्षिक योजनांचा विचार करता १०व्या व ११व्या पंचवार्षिक योजनांमध्ये शिक्षणावर चांगला भर देण्यात आला आहे. परंतु, १०व्या पंचवार्षिक योजनेत उच्च शिक्षणाच्या तुलनेत प्राथमिक शिक्षणावरच मोठया प्रमाणात भर देण्यात आला आहे. ११व्या पंचवार्षिक योजनेमध्ये मात्र उच्च शिक्षणाकडे विशेष लक्ष दिल्याचे दिसून येते. या योजनेत उच्च शिक्षणाचा विस्तृतपणे विचार केला आहे. समाजातील दुर्बल आणि मागास घटकांच्या शिक्षणासाठी समावेशक शिक्षणाचा विशेष विचार ११व्या पंचवार्षिक योजनेत केल्याचे दिसून येते.

भारतामध्ये सन १९५१ पासून २०१२ पर्यंत एकूण ११ पंचवार्षिक योजना राबविण्यात आल्या. प्रारंभीच्या दोन योजनांमध्ये पायाभूत सुविधा, समुदाय विकास कार्यक्रम व माणूस हाच विकासाचा केद्रंबिंदू मानून पंचवार्षिक योजनांची उदिद्ष्टये निश्चित करण्यात आली. कालानुक्रमे रोजगार, शिक्षण या बरोबरच स्वयंपूर्णतेकडे जलद वाटचाल करण्यासाठीचे प्रयत्न झाले. ८ व्या पंचवार्षिक योजना कालावधीत प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण घडवून आणणे व वय वर्ष १५ ते ३५ वयोगटातील निरक्षरता दूर करणे म्हणजेच प्रौढ शिक्षणाचा प्रचार व प्रसार या योजना कालावधीत करण्यात आला. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीरणाच्या प्रयत्नानंतर १० व्या व ११ व्या पंचवार्षिक योजना कालावधीमध्ये उच्च शिक्षणाकडे तसेच या शिक्षणामधील सर्वसमावेशकतेकडे लक्ष केद्रींत करण्यात आले.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies